वीजदर पुस्तिका

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका)

वित्तिय वर्ष २०२३-२४ आणि वित्तिय वर्ष २०२४-२५
पर्यंतची वीजदर अनुसूची

वीजदर अनुसूची
(१ एप्रिल २०२३ पासून लागू)

या वीजदर पत्रक अनुसूचीच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी वीजदर अनुसूचीमधील कोणत्याही शब्दांचा / मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि / किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील वीजदर अनुसूची ग्राहय धरण्यात यावी.

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

(बृहन्मुंबई महानगरपालिका)

वीजदरांची अनुसूची

(दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून लागू)

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६१ आणि ६२ अन्वये आपल्या निहित अधिकारांचा वापर करुन आणि त्यास सक्षम केलेल्या इतर सर्व अधिकारानुसार, २०२२ चे प्रकरण क्र.२१२ मधील मध्यावधी वीजदर आढावा याचिके बाबत दि.३१ मार्च २०२३ च्या आदेशानुसार आयोगाने निश्चित केलेले, बेस्ट उपक्रमाच्या विविध वर्गातील वीज ग्राहकांसाठी वीज पुरवठयाचे दर **दि.१ एप्रिल,२०२३** पासून लागू होतील.

सर्वसाधारण (जनरल) :-

१.० सध्या प्रचलित असलेल्या सर्व विद्युत दरांना सदर विद्युत दर अधिक्रमीत करतील.

२.० आयोगाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाच्या अधीन राहून सुधारित वीज दर आणि / किंवा अधिभार वितरण परवानाधारकांतर्फे आकारण्यात येईल.

३.० शासकीय किंवा इतर सक्षम प्राधिकरणातर्फे आकारण्यात येणा-या वीज शुल्क, विजेच्या विक्रीवरील कर, व इतर शुल्क हे वीजदराव्यतिरिक्त असेल आणि सर्व ग्राहकांना वीजदरा व्यतिरिक्त आकारण्यात येईल.

४.० एकाच जागी / ठिकाणी करण्यात येणा-या वीज पुरवठयाला सदर वीजदर लागू होतील.

५.० वितरण परवानाधारक, आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता विनियम २०२१ च्या अधीन राहून जेथे एखाद्या प्रवर्तनात वापर होत असलेल्या भारात जर मोठे चढउतार होत असल्याचे आढळल्यास तेथे ३० मिनिटपेक्षा कमी / १५ मिनिटापेक्षा जास्त कालावधीतील अधिकतम मागणीचे मापन करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

६.० प्रचलित विनियमांमधील तरतूदीनुसार आणि आयोगाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार सदर विद्युत दर आहेत.

७.० स्पष्टपणे वेगळे सांगितले नसेल तर, महिन्याभरात वापरल्या जाणा-या ऊर्जेसाठी ऊर्जा आकार आणि वहन आकाराची आकडेवारी रुपयामध्ये प्रति युनिट (केडब्ल्यूएच किंवा केव्हीएएच जसे असेल तसे) मध्ये दिले आहे.

८.० इंधन समायोजन आकार (इं.स.आ.) हा बहुवर्षिय वीजदर विनियम २०१९ च्या तरतुदीनुसार

गणला जातो आणि आयोगाने याबाबत वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे सर्व प्रवर्गातील ग्राहकांवर लागू असेल व तो मूळ वीजदराशिवाय वापर केलेल्या वीजेवर गणना करुन आकारण्यात येईल.

लघुदाब (एल्.टी) वीजदर

लघुदाब I (ए): एल्.टी – निवासी (दारिद्रय रेषे खालील) (बी.पी.एल)

पात्रता:

ज्या वीजग्राहकांनी मागील वित्तिय वर्षामध्ये प्रतीवर्षी ३६० युनिटस पर्यंतचा वापर केला आहे आणि ज्यांचा मंजूर विद्युत भार ०.२५ किलोवॅट पर्यंत आहे, अशा वीजग्राहकांसाठी दारिद्रय रेषेखालील वीजदर लागू आहेत. अशा ग्राहकांची पात्रता प्रत्येक वित्तिय वर्षाच्या अखेरीस पुनश्च: निर्धारित केली जाईल. जर मागील वित्तिय वर्षामध्ये ३६० युनिटसपेक्षा जास्त युनिटस वापरले असतील तर अशा वीज ग्राहकांना एल्.टी I (बी) – निवासी प्रवर्गाचे वीजदर लागू होतील, आणि भविष्यातील त्याचा वीज वापर विचारात न घेता, असा ग्राहक पुन्हा निवासी (दारिद्रय रेषेखाली) प्रवर्गात पात्र ठरणार नाही.

जर वर्षाच्या काही भागासाठी वीजेचा वापर केला गेला असेल, तर दारिद्रय रेषेखालील वीजग्राहकांची वर्गवारी यथाप्रमाण तत्वावर वित्तिय वर्षाच्या अखेरीस पुन: र्निधारण केली जाईल, मागील वर्षादरम्यान वाढलेल्या दारिद्रय रेषेखालील वीजग्राहकांची वर्गवारी यथाप्रमाण तत्वावर आधारित म्हणजेच ३० युनिटस प्रति महिना नुसार निर्धारीत केले जाईल.

दारिद्रय रेषेखालील प्रवर्ग हा ज्यांचा पहिल्या बिलिंग महिन्यात मंजूर भार ०.२५ किलो वॅट आणि १ ते ३० युनिटस् दरम्यान वीजेचा वापर (१ युनिट /दिवसाच्या यथाप्रमाण तत्वावर) अशा कोणत्याही महिन्यात जोडलेल्या सर्व नवीन ग्राहकांना देखील लागू होईल.

बीपीएल वीजदर केवळ वैयक्तिक वीजग्राहकांना लागू असून संस्थांना लागू नाही.

वीज दर सूची : एल्.टी - निवासी दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल)

वापर टप्पा (के.डब्लू.एच.)	स्थिर/मागणी आकार	ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)	वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)
वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१	रू. ११ प्रति महिना	१.५०	१.७४

मार्च २०२४ **पर्यंन्त**			
वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यंन्त**	रू. १२ प्रति महिना	१.५२	१.९७

<u>लघुदाब I (बी) : लघुदाब –निवासी</u>

<u>पात्रता</u>:

सदर वीजदर प्रवर्ग निम्न / मध्यम व्होल्टेजवर वापरल्या जाणा-या विद्युत उपकरणासाठी जसे प्रकाश (दिवे), गरम करणे, थंड करणे, स्वयंपाक करणे, धुणे / साफसफाई, मनोरंजन / विश्रांती पाण्याचे पंपींग यासारख्या उददेशाने खालील आवारात वापरल्या जाणा-या वीजेसाठी लागू आहे.

ए) खाजगी निवासी परिसर, शासकीय आणि निमशासकीय निवासी वसाहत; खाजगी **कॉर्पोरेट** संस्थांची कर्मचारी वसाहत / वसतिगृहे / विश्राम घरे.

बी) पूजेसाठी वापरला जाणारा परिसर जसे मंदिरे, गुरुद्वारा, चर्च, मशिदी इत्यादी, मात्र संलग्न हॉल्स, बागा किंवा अशा परिसराचा इतर भाग जो व्यावसायिक **उद्देशां**साठी वापरला जाईल त्यास प्रचलित एलटी II वीजदर आकारण्यात येईल, जोपर्यंत इतर श्रेणीमध्ये निर्दिष्ट केलेले नाही,

सी) शासकीय / खाजगी / सहकारी गृहनिर्माण वसाहती /संकुले येथील (जिथे वीज केवळ घरगुती **उद्दे**शाने वापरली जाते) फक्त सामायिक सुविधा जसे की, पाणी पंपिंग /रस्ते आणि सामायिक क्षेत्रातील प्रकाश (दिवे)/लिफ्ट/पार्किंग लॉट/ अग्निशमन पंप व इतर उपकरणे इ.,

डी) सरकारी / खाजगी / सहकारी गृहनिर्माण संस्था / संकुले यांचे त्याच आवारातील स्पोर्टर्स क्लब किंवा सुविधा / हेल्थ क्लब किंवा सुविधा /व्यायामशाळा / जलतरण तलाव / कम्युनिटी हॉल आणि त्याचा फक्त त्याच गृहनिर्माण संस्था / संकुलातील सभासद आणि कर्मचारी वापर करत असल्यास;

ई) अपंग व्यक्ती / अपंग व्यक्तींच्या मालकीचे / संचालित टेलिफोन बूथ;

एफ्) वकील, डॉक्टर, अभियंते, चार्टर्ड अकाउंटंटस इत्यादी व्यावसायिकांनी त्यांच्या व्यावसायिक क्रियाकलापांच्या उपयोगाकरीता वापरलेले निवासी परिसर, परंतु नर्सिंग होम आणि सर्जिकल वॉर्डर्स किंवा हॉस्पिटल यांचा समावेश नसलेले;

जी) मर्यादीत उद्‌देशाच्या वापरासाठी, सिंगल-फेज घरगुती पीठ गिरणी (घर-घंटी);

एच्) निवासी एलटी ग्राहक, ज्याचा वापर प्रती महिन्यात ५०० युनिट (पुरवठ्याचा महिना) पर्यंत आहे, जो आपल्या विद्यमान जागेत बांधकाम किंवा नूतनीकरणाची कामे करतो : अशा ग्राहकाला स्वतंत्र तात्पुरती जोडणी आवश्यक नाही आणि अशा वीज ग्राहकांना निवासी दराच्या दराने देयक आकारले जाईल.

आय्) पर्यटन स्थळे व धार्मिक स्थळांवर, घरी रहाण्याची सुविधा.

जे) ग्राहक त्यांच्या निवासस्थानाच्या भागातून व्यवसाय किंवा वाणिज्यीक /औद्योगिक / अनिवासी उपक्रम राबवित आहेत, ज्यांचा मासिक वापर महिन्यात ३०० युनिटस पर्यंत आहे आणि मागील आर्थिक वर्षात वार्षिक वापर ३६०० युनिटस पर्यंत होता, अशा ग्राहकांना या वीजदराच्या पात्रतेचे मूल्यमान प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी केले जाईल.

मागील आर्थिक वर्षातील वापर ३६०० युनिटपेक्षा जास्त झाला असेल तर असे ग्राहक त्यानंतर या प्रवर्गाअंतर्गत शुल्कासाठी पात्र ठरणार नाहीत, परंतु अशा प्रकारच्या वापरासाठी लागू असणा-या वीजदरावर शुल्क आकारले जाईल, हयाची पूर्वसूचना वीज ग्राहकास दिली जाईल.

के) खालील बाबींमधील वीज (अडचणी दूर करणे) आठव्या आदेश २००५ नुसार निवासी **उद्दे**शाने निम्न /मध्यम व्होल्टेजवर एकाच ठिकाणी वीजपुरवठा केला जातो.

(i) आवाराची मालकी असणारी सहकारी गट गृहनिर्माण संस्था त्याच सोसायटीच्या सदस्यांना निवासी हेतूंसाठी त्याच परिसरात राहणाऱ्यांना वीज उपलब्ध करुन देण्यासाठी आणि,

(ii) एखादया व्यक्तीस, निवासी **उद्दे**शाने त्याच आवारात राहणा-या आपल्या कर्मचा-यांना वीज उपलब्ध करुन देण्यासाठी.

एल) प्रकाशयोजनासह सर्व कारणांसाठी स्मशानभूमी आणि दफनभूमी, विद्युत भट्‌टी, पाण्याचा पंप इत्यादी.

.

एम) तात्पुरत्या स्वरुपात गणेशोत्सव, नवरात्र, ईद, मोहरम, रामलीला, दिवाळी,ख्रिसमस, गुरु नानक जयंती, गोपालकाला उत्सव, दसरा, इत्यादी सार्वजनिक धार्मिक कार्याकरिता आणि ज्या ठिकाणी सामुदायिक प्रार्थना केल्या जातात आणि गांधी जयंती, आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, महाराष्ट्र दिन इत्यादीसारख्या सार्वजनिक सुट्ट्या जाहीर केल्या गेलेल्या व्यक्तिमत्त्वांचे वर्धापन दिन स्मरणार्थ आणि राष्ट्रीय किंवा राज्य कार्यक्रमांच्या समारंभासाठी.

परंतु अशा प्रकारच्या तात्पुरत्या जोडण्या हया १.५ पट स्थिर आकाराच्या अधिन असेल.

टिप: सदर वीजदर श्रेणी वरील (आय) आणि (जे) व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणांसाठी उच्च व्होल्टेजवर वीज पुरवठा करणा-या ग्राहकांना देखील लागु असेल.

एल्.टी I (बी) साठी वीजदरांची अनुसूची : लघु दाब – निवासी

१ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ चे वीजदर.

वापर टप्पा (के.डब्लू.एच.)	स्थिर/मागणी आकार $$	ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)	वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)
०-१०० एकके	रू. ८५/- प्रति जोडणी प्रति महिना	१.९५	१.७४
१०१–३०० एकके	रू. १२५/- प्रति जोडणी प्रति महिना	५.३०	१.७४
३०१-५०० एकके	रू. १२५/- प्रति जोडणी प्रति महिना	८.८९	१.७४
५०० एककेपेक्षा जास्त	रू. १५०/- प्रति जोडणी प्रति महिना	१०.८६	१.७४

१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ चे वीजदर.

वापर टप्पा (के.डब्लू.एच.)	स्थिर/मागणी आकार $$	ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)	वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)
०-१०० एकके	रू. ९०/- प्रति जोडणी प्रति महिना	१.८७	१.९७
१०१–३०० एकके	रू. १३५/- प्रति जोडणी प्रति महिना	५.४६	१.९७
३०१-५०० एकके	रू. १३५/- प्रति जोडणी प्रति महिना	९.५६	१.९७
५०० एककेपेक्षा जास्त	रू. १६०/- प्रति जोडणी प्रति महिना	११.७३	१.९७

टीप :

ए) $$:उपरोक्त स्थिर आकार एकेरी प्रावस्था (सिंगल फेज) जोडणीसाठी आहेत. तीन प्रावस्था (थ्री फेज) पुरवठा जोडणी टप्प्यातील पुरवठा घेणा-या निवासी वीज ग्राहकांसाठी प्रतीमाह रु.१५० स्थिर आकार आकारला जाईल. वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता अतिरिक्त स्थिर आकार रु.१५० प्रती १० किलोवॅट किंवा १० किलोवॅट भारापेक्षा अधिकच्या अंशत: भागांवर देय असेल, आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये रु.१६० प्रतिमाह आणि प्रति १० किलो वॅट पेक्षा अतिरिक्त भारच्या अंशत: भागांवर स्थिर आकारात वाढ होईल.

बी) व्यावसायिक जसे की वकील,डॉक्टर, व्यावसायिक अभियंते, चार्टर्ड अकांऊंटटस इत्यादी केवळ त्यांचा व्यवसाय करण्यासाठी परिसर वापरत असतील, ते या शुल्कासाठी पात्र ठरणार नाहीत आणि अशा संबंधित प्रवर्गांना लागू असलेल्या वीजदरानुसार शुल्क आकारले जाईल.

एल टी –II: एल्.टी. - अनिवासी किंवा वाणिज्य

पात्रता:

ए. ०-२० (केडब्लू)

सदर वीजदर प्रवर्ग निम्न /मध्यम व्होल्टेजवर प्रकाश (दिवे), गरम, थंड, स्वयंपाक करणे, धुणे /साफसफाई करणे, मनोरंजन / विश्रांती आणि पाण्याचे पंपिंग या **उद्दे**शाकरिता वापरल्या जाणा-या विविध उपकरणे चालवण्यासाठी अनिवासी, बिगर औदयोगिक आणि / किंवा वाणिज्यीक परिसरातील वाणिज्यीक उपयोगासाठी वापरल्या जाणा-या वीजेसाठी लागू आहे, परंतु खालील परिसरासाठी मर्यादित नाही.

ए) शॉपिंग मॉल्स आणि शोरुम्स, प्रदर्शन केंद्रासहित अनिवासी, वाणिज्यीक आणि व्यवसाय परिसर;

बी) कोठारे / गोदाम

सी) फिल्म स्टुडीओज, चित्रपटगृहे, नाटयगृहे (मल्टिप्लेक्ससह), आतिथ्य, विश्रांती, सभा / टाऊन हॉल्स आणि मनोरंजन व सार्वजनिक करमणूकीसहीत; करमणुकीशी संबंधित व्यवस्थेच्या सामाईक प्रकाश व्यवस्था आणि वीज पुरवठा करण्याकरीता;

डी) वाणिज्य आस्थापनासहित कार्यालय

इ) एल-टी १ प्रवर्गात नसलेले विवाह दालन (हॉल), हॉटेल्स /उपहारगृहे, आईस्क्रिम पार्लर्स, कॉफीशॉप्स, अथितीगृह (गेस्ट हाऊसेस), इंटरनेट /सायबर कॅफेज, टेलिफोन बूथ आणि फॅक्स / छायाप्रत दुकाने;

एफ) ऑटोमोबाईल आणि इतर सर्व प्रकारच्या दुरूस्ती, सर्व्हिसिंग आणि देखभाल केंद्रे (विशेषत: दुस-या वीजदर प्रवर्गात नसल्यास) गॅरेजसह किरकोळ गॅस भरण्याचे स्टेशन, पेट्रोल पंप व सेवाकेंद्र;

जी) टोल वसूली नाका (प्लाझा).

एच) टेलरिंग दुकाने, संगणक प्रशिक्षण संस्था, **खाजगी** प्रशिक्षण संस्था, टायपिंग संस्था, छायाचित्र प्रयोगशाळा, ब्यूटी पार्लर आणि सलून, **मोबाईल शॉपीज.**

आय) बँका आणि एटीएम केंद्रे, टेलिफोन एक्सचेंज, टीव्ही स्टेशन्स, मायक्रोवेव्ह स्टेशन्स, रेडिओ

स्टेशन्स;

जे) वाणिज्य संकुलामध्ये सामाईक सुविधा, जसे कि पाण्याचे पंपिग/ लिफ्ट्स/ अग्निशमन पंप्स आणि इतर उपकरणे / रस्ते आणि अन्य सामाईक क्षेत्रातील प्रकाश व्यवस्था इ.,

के) स्पोर्टस क्लब / सुविधा, हेल्थ क्लब /सुविधा, व्यायामशाळा, जलतरण तलाव इतर कोणत्याही प्रवर्गात समाविष्ट नसलेले;

एल) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) किंवा संबंधित स्थानिक प्राधिकरणाद्वारे मान्यता प्राप्त स्मारके / ऐतिहासिक / वारसा इमारतींचे बाहय रोषणाई.

एम) सर्व प्रकारच्या संरचना बांधकाम / पायाभूत सुविधा जसे की इमारती, पूल, उड्डाणपूल, धरणे, उर्जा स्टेशन, रस्ते, विमानतळ, सर्व कामांसाठी पाइपलाइन टाकण्यासाठी बोगदा तयार करणे;

टीप : एल-टी निवासी ग्राहक जे प्रति महिना ५०० युनिटस पेक्षा अधिक वीजेचा वापर करत असतील (पुरवठयाचा विदयमान महिना) आणि ज्यांनी त्यांच्या राहत्या जागेत बांधकाम किंवा नूतनीकरणाची कामे केली आहे. अशा ग्राहकांना तात्पुरत्या प्रवर्गाची वीज जोडणी घेण्याची आवश्यकता नाही, त्यांना एल टी II व्यावसायिक (वाणिज्य) वीजदर आकारण्यात येईल;

एन्) दूध संकलन केंद्र; स्वतंत्र दूध शीतगृहे, साठवणूक केंद्र.

ओ) एलटी - सार्वजनिक सेवा किंवा एलटी - औद्योगिक प्रवर्गांतर्गत समाविष्ट नसलेले मल:निसारण प्रक्रिया संयंत्र / वाणिज्य संकुलांचे सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र;

पी) जाहिराती, जाहिरात फलक (दिवा स्तंभावर लावलेले / रस्त्याच्या बाजूला संच मांडणी केलेल्या जाहिरात फलकासहित) आणि इतर व्यावसायिक रोषणाई जसे की बाहय प्रकाशझोत,प्रदर्शन,विविध वस्तू भांडारातील निऑन चिन्हे,मॉल्स,मल्टिप्लेक्स, सिनेमागृहे, क्लब,उपहारगृहे आणि अशा इतर आस्थापना;

क्यू) निवासी प्रवर्गाअंतर्गत न येणा-या अन्य कार्याकरिता तात्पुरता पुरवठा;

परंतु तात्पुरता पुरवठा घेणारा ग्राहक १.५ पट लागू असलेले स्थिर / मागणी शुल्क आणि लागू असलेले १.२५ पट ऊर्जा शुल्क प्रदान करेल.

तसेच, निवासी किंवा अन्य आवारात अग्निशमन पंप आणि उपकरणांच्या प्रवर्तनाकरिता घेतलेल्या तात्पुरता पुरवठयास त्या-त्या आवाराला लागू असलेले वीजदर प्रवर्गानुसार लागू असेल.

बी) २० केडब्ल्यू आणि ≤ ५० केडब्ल्यू (सी) > ५० केडब्ल्यू

पात्रता:

एलटी ॥ (ए) मध्ये वर्णन केलेल्या पात्रतेप्रमाणे आणि या उपश्रेणीमध्ये लागू असलेल्या श्रेणीतील मंजूर लोडसाठी, म्हणजेच एलटी ॥ (बी) आणि एलटी ॥ (सी).

एलटी ॥ साठी विजदर सूची : एलटी - अनिवासी किंवा वाणिज्य

१ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ चे वीजदर.

वापर टप्पा (के.डब्लू.एच.)	**स्थिर / मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)**
(अ) ०-२० (केडब्लू)	रू. ४४५ प्रति जोडणी प्रति महिना	६.७४	१.७४
(ब) > २० (केडब्लू) आणि ≤ ५० (केडब्लू)	रू. ३७५ प्रति केव्हिए प्रति महिना	५.६०	१.७४
(क) > ५० (केडब्लू)	रू. ३७५ प्रति केव्हिए प्रति महिना	५.५३	१.७४
टिओडी वीजदर (वरिल मूळ दरा व्यतिरीक्त)			
०६०० – ०९०० तास		–	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		–	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ चे वीजदर.

वापर टप्पा (के.डब्लू.एच.)	स्थिर / मागणी आकार	ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)	वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)
(अ) ०-२० (केडब्लू)	रू. ४७५ प्रति जोडणी प्रति महिना	७.०८	१.९७
(ब) > २० (केडब्लू) आणि ≤ ५० (केडब्लू)	रू. ४०० प्रति केव्हिए प्रति महिना	५.८८	१.९७
(क) > ५० (केडब्लू)	रू. ४०० प्रति केव्हिए प्रति महिना	५.२५	१.९७
टिओडी वीजदर (वरिल मूळ दरा व्यतिरीक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

टी.ओ.डी. वीजदर, एल्टी. ॥ (बी) आणि (सी) प्रवर्गाला लागू आहेत आणि एल्.टी. ॥ (ए) प्रवर्गाच्या टी.ओ.डी. मीटर असणाऱ्या वीग्राहकांना पर्यायी उपलब्ध असतील.

<u>एल्.टी. III - एल्.टी. - औद्योगिक</u>

<u>एल्.टी. III (ए): एल्.टी - औद्योगिक (२० किलो वॅट पर्यंत भार)</u>

एल्.टी. III (बी): एल्.टी - औद्योगिक (२० किलो वॅट पेक्षा अधिकभार)

<u>पात्रता :-</u>

सदर वीजदर प्रवर्ग उत्पादन आणि प्रक्रिया उद्देशांसाठी, तसेच त्या औद्योगिक आवारात सामाईक प्रकाश (दिवे), गरम / थंड करणे इत्यादी औद्योगिक वापरासाठी कमी / मध्यम व्होल्टेज स्वरुपात वीज पुरवठ्याकरिता लागू आहे.

प्रशासकीय कार्यालये / कॅन्टीन, मनोरंजन हॉल/ स्पोर्टस् क्लब किंवा सुविधा / हेल्थ क्लब किंवा सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव जे केवळ औद्योगिक कर्मचा-यांच्या वापराकरिता असतील असे; उद्दवाहन, पाण्याचे पंप, अग्निशमन पंप आणि उपकरणे, रस्ते व सामाईक आवारातील दिवे, संशोधन व विकास गट, धोबी/लॉन्ड्री इत्यादी – या करिता देखील सदर वीजदर वीज/ऊर्जा पुरवठयाच्या वापराकरिता लागू आहे.

तसेच, अशा सर्व सुविधा त्याच औद्योगिक आवारात असतील आणि एकाच जागेवरून (पॉईंटमधून) वीज पुरवठा होत असल्यास.

महाराष्ट्र राज्य सरकारने लागू केलेल्या माहिती तंत्रज्ञान / आय.टी धोरणात परिभाषित केल्यानुसार माहिती तंत्रज्ञान (आय.टी) किंवा आय.टी तत्सम सेवा (आय.टी.इ.एस.) युनिटच्या वीज / ऊर्जा वापरण्यासाठी सदर वीजदर प्रवर्ग लागू असेल.

हि दर श्रेणी महाराष्ट्र शासन धोरण २०१८ अंतर्गत एकात्मिक लॉजिस्टीक पार्कसाठी देखील लागू होईल.

पुढील उद्देशांसाठी वीज / ऊर्जा पुरवठा (परंतु एवढयाकरिता मर्यादित नाही) देखील लागू असेल.

ए) धोबी / लॉंड्री उपक्रम.

बी) पिठाची गिरणी, डाळ गिरणी, तांदूळ गिरणी, पोहा गिरणी, मसाला गिरणी, सॉ मिल्स;

सी) आईस फॅक्टरीज, आईस्क्रिम उत्पादक युनिटस्, दूध प्रक्रिया / शीतकरण संयंत्र (दुग्ध शाळा);

डी) अभियांत्रिकी कार्यशाळा, अभियांत्रिकी वस्तू उत्पादन युनिटस्; मुद्रणालय; रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) दुरूस्ती कार्यशाळा; टायर रिट्रेडिंग युनिट्स व व्हल्कॅनाइझिंग युनिट्स; रबर उत्पादन निर्मिती, पॅकेजिंग साहित्य निर्मिती.

इ) संरक्षण आस्थापनांचे अध्यादेश/दारूगोळा कारखाने.

एफ) खाणकाम, उत्खनन आणि दगड क्रशिंग युनिट;

जी) गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स;

एच्) साबण आणि सौंदर्य प्रसाधने, दुर्गंधीनाशक उत्पादन इत्यादी.

आय) एलपीजी / सीएनजी बॉटलिंग कारखाना आणि संबंधित गॅस भरणा केंद्र इत्यादी.

जे) एलटी – सार्वजनिक सेवा प्रवर्गांतर्गत नसलेले मल:निसारण प्रक्रिया संयंत्र / उद्योगांसाठी सामाईक सांडपाणी संयंत्र;

के) निर्मिती संयंत्रकाला स्टार्ट-अप ऊर्जा, म्हणजेच, युनिट आणि त्याची सहाय्यकारी यंत्रणा कार्यान्वित करताना ऊर्जासंयंत्राच्या (पॉवर प्लांट) चाचणीसाठी आवश्यक असलेली ऊर्जा, आणि त्याच्या स्टार्ट-अपकरिता नियोजित किंवा सक्तीच्या आऊटेजनंतर (परंतु बांधकामासाठी नाही) लागणारी ऊर्जा;

एल) विट भट्टी, बायोमास पेलेट.

एम) महाराष्ट्र शासनाच्या जैव तंत्रज्ञान धोरणाअंतर्गत समावेश असलेले जैव तंत्रज्ञान उदयोग.

एन) एल्.टी. V (बी) –प्रवर्गांतर्गत समाविष्ट नसलेले शीतगृह (कोल्ड स्टोरेज); शेती (इतर), बंदिस्त केलेले पेयजल संयंत्र.

ओ) अन्न प्रक्रिया युनिट (सीफूड आणि मांस यासह), खांडसरी / गूळ उत्पादन युनिटस्.

पी) एकल (Stand-alone) संशोधन व विकास युनिट;

क्यू) दूरसंचार टॉवर आणि संबंधीत दूरसंचार पायाभूत सुविधा परंतू कार्यालये, दुकाने इत्यादी समाविष्ठ होत नाही.

आर) केवळ कमी / मध्यम भारवर जोडलेले पॉवरलूम्स व इतर संलग्न उपक्रम जसे वॉरपिंग, डबलिंग, टिवस्टींग वैगरे.

एस) अती उच्च दाब (इएचव्ही)/वितरण उपकेंद्रांना सहाय्यक वीज पुरवठा (परंतू बांधकामासाठी नाही).

टी) रेडी-मिक्स कँाक्रिट किंवा हॉट मिक्स प्लांटस्

एल्.टी. III - एल्.टी. - औद्योगिक **विजदर सूची**

१ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ चे वीजदर.

वापर टप्पा (के.डब्ल्यू.एच.)	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.डब्ल्यू.एच.)**	**वहन (व्हिलिंग आकार (रू./के.डब्ल्यू.एच.)**
एल टी III (अ): ०-२० (केडब्ल्यू)	रू. ४४५ प्रति जोडणी प्रति महिना	६.२३	१.७४
एल टी III (ब): २० (केडब्ल्यू) पेक्षा जास्त	रू. ३७५प्रति केव्हिए प्रति महिना	६.१७	१.७४
टिओडी वीजदर (पर्यायी - वरिल मूळ दरा व्यतिरीक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ चे वीजदर.

वापर टप्पा (के.डब्ल्यू.एच.)	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.डब्ल्यू.एच.)**	**वहन (व्हिलिंग आकार (रू./के.डब्ल्यू.एच.)**
एल टी III (अ): ०-२० (केडब्ल्यू)	रू. ४७५ प्रति जोडणी प्रति महिना	६.७३	१.९७
एल टी III (ब): २० (केडब्ल्यू) पेक्षा जास्त	रू. ४०० प्रति केव्हिए प्रति महिना	६.६६	१.९७
टिओडी वीजदर (पर्यायी - वरिल मूळ दरा व्यतिरीक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	

२२०० – ०६०० तास		(०.७५)	

टिप :

टी.ओ.डी. वीजदर एल.टी. III (बी) करिता (म्हणजे २० किलोवॅट वरील) अनिवार्य आहेत आणि एल.टी.III (ए) प्रवर्गाच्या टी.ओ.डी मीटर धारकांना (म्हणजे २० किलावॅट पर्यंत) पर्यायी उपलब्ध असतील.

एल्.टी IV : सार्वजनिक सेवा

एल्.टी IV (ए) : एल्.टी – सरकारी शैक्षणिक संस्था आणि रूग्णालय

पात्रता:

सदर वीजदर प्रवर्ग राज्य किंवा केंद्र सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था जसे नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती इत्यादींचे शैक्षणिक संस्था जसे शाळा व महाविदयालये; आरोग्य सेवा सुविधा जसे रूग्णालये, दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्र, निदान केंद्र, रक्तपेढी आणि पॅथॉलॉजी प्रयोग शाळा; सार्वजनिक स्वच्छताविषयक सुविधा, ग्रंथालय आणि सार्वजनिक वाचन कक्ष यांना निम्न / मध्यम व्होल्टेजने वीजपुरवठा करण्यासाठी लागू आहे.

सदर वीजदर प्रवर्ग हा त्या शैक्षणिक संस्था /रुग्णालये, वसतिगृहे यांच्या आवारातील संलग्न असलेल्या स्पोर्टस क्लब आणि सुविधा / आरोग्य केंद्र आणि सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव आणि मुख्यत: अशा शैक्षणिक संस्थेच्या / रुग्णालयाच्या विदयार्थी / शिक्षक / कर्मचारी / रूग्णांकरिता वापरात असल्यास लागू असेल.

हि वीजदर सूची सार्वजनीक स्वच्छताविषयक सुविधावरील पुरवठयासाठी देखील लागू असेल.

एलटी IV (ए) साठी वीजदर पत्रक: सार्वजनीक सेवा – सरकारी शैक्षणिक संस्था आणि रूग्णालये

१ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२५ चे वीजदर.

वापर टप्पा (के.डब्लू.एच.)	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)**
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यंन्त**	रू. ४४५ प्रति जोडणी प्रति महिना	६.८१	१.७४
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यंन्त**	रू. ४७५ प्रति जोडणी प्रति महिना	७.१५	१.९७
टिओडी वीजदर (वरिल मूळ दरा व्यतिरीक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

टिप :

मागणी करार / मंजूर भार २० के.डब्ल्यू. पेक्षा जास्त असलेल्या एल्.टी. IV (ए) प्रवर्गाकरिता हे टी.ओ.डी. वीजदर अनिवार्य असेल, आणि मागणी करार / मंजूर भार २० के.डब्ल्यू. पर्यंत असलेल्या टी.ओ.डी. मीटर धारकांना एल्.टी. IV (ए) प्रवर्गाकरिता पर्यायी उपलब्ध असेल.

<u>एल्.टी IV (बी) : एल्.टी- सार्वजनिक सेवा– इतर</u>

<u>पात्रता:</u>

सदर वीजदर प्रवर्ग निम्न / मध्यम व्होल्टेजव्दारे पुढील बाबींसाठी वीजपुरवठा करण्यासाठी लागू आहे:

ए) राज्य किंवा केंद्र सरकार किंवा नगरपालिका, जिल्हापरिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती इत्यादींसारख्या स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या व्यतिरिक्त इतर शाळा आणि महाविदयालयांसारख्या शैक्षणिक संस्था; रूग्णालये, दवाखाने, क्लिनिक्स्, प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र, निदान केंद्र आणि **पॅथॉलॉजी** प्रयोगशाळा यांसारख्या आरोग्य सेवा सुविधा; ग्रंथालय आणि सार्वजनिक वाचन कक्ष;

बी सदर वीजदर प्रवर्ग हा त्या शैक्षणिक संस्था /रुग्णालय यांच्या आवारातील असलेल्या स्पोर्टस क्लब आणि सुविधा / आरोग्य केंद्र आणि सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव आणि मुख्यतः अशा शैक्षणिक संस्थेच्या / रुग्णालयाच्या विदयार्थी / शिक्षक / कर्मचारी / रूग्णांकरिता वापरात असल्यास लागू असेल;

सी) शासकीय व महानगरपालिका / स्थानिक प्राधिकरणे / स्थानिक स्वराज्य संस्था जसे महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती; पोलिस स्टेशन आणि पोलिस चौकी; टपाल कार्यालये; सशस्त्र सेना / संरक्षण आणि निम-लष्करी आस्थापना या सर्वाची कार्यालये;

डी) सेवा-केंद्रित आध्यात्मिक संस्था;

इ) भाविकांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक धर्मादाय संस्था आधिनियमांतर्गत नोंदणीकृत धार्मिक संस्थाकडून निवासाची व्यवस्था.

एफ) राज्य किंवा महानगरपालिका / स्थानिक प्राधिकरण परिवहन आस्थापने त्यांच्या कार्यशाळांसह;

एच) विमानतळ;

आय) बंदरे, जेट्टी आणि किना-यावरिल वीज पुरवठयासाठी तरतूद.

जे) वीज पुरवठा निम्न / मध्यम व्होल्टेजवरील असल्यास दुकाने, कार्यशाळा. आवारे इत्यादीच्या समावेशासह रेल्व / मेट्रो / मानोरेल स्टेशनस ;

के) शैक्षणिक संस्थांशी संलग्न असलेले सर्व विदयार्थी वसतिगृह;

एल) इतर सर्व विदयार्थी किंवा नोकरी करणारे पुरूष / महिला वसतिगृह;

एम) इतर प्रकारची घरे/वसतिगृहे, जसे की (i) निराधार, अपंग व्यक्ती (शारीरिक किंवा मानसिक अपंग व्यक्ती इत्यादी) आणि मानसिकरित्या आजारी व्यक्ती यांच्या करिता घरे / वसतिगृहे (ii) रिमांड होम (iii) धर्मशाळा, (iv) सुधारगृह (v) पुरवठा परवानाधारकाच्या झोनल मुख्य अभियंता किंवा तत्सम अधिकारी यांनी पडताळणी करुन पुष्टीकरणांच्या अधीन असलेली अनाथाश्रम;

एन) धरणाचे काम ज्यात प्रकाशयोजना आणि इतर कामे वैगरे.

ओ) पाण्याचे पंपिंग, पाणी शुध्दीकरण आणि सार्वजिनक पाणीपुरवठा योजनेशी संबंधित कामे, मल:निसारण प्रक्रिया संयंत्र आणि कचरा प्रक्रिया युनिटस्.

एल्.टी IV (बी) : एल्.टी- सार्वजनिक सेवा - <u>इतर</u>

१ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२५ चे वीजदर.

वापर टप्पा (के.डब्लू.एच.)	स्थिर/मागणी आकार	ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)	वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यंन्त**	रू. ४४५ प्रति जोडणी प्रति महिना	६.८२	१.७४
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यंन्त**	रू. ४७५ प्रति जोडणी प्रति महिना	७.१६	१.९७
टिओडी वीजदर (वरिल मूळ दरा व्यतिरीक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	

२२०० – ०६०० तास		(०.७५)	

टिप :- मागणी करार / मंजूर भार २० के.डब्ल्यू. पेक्षा जास्त असलेल्या एल्.टी. **IV** (बी) प्रवर्गाकरिता हे टी.ओ.डी. वीजदर अनिवार्य असेल, आणि मागणी करार / मंजूर भार २० के.डब्ल्यू. पर्यंत असलेल्या टी.ओ.डी. मीटर धारकांना एल्.टी. **IV** (बी) प्रवर्गाकरिता पर्यायी उपलब्ध असेल.

एल्.टी. V कृषी

एल्.टी. V (ए): एल्.टी. - कृषी - पंपसंच

पात्रता :

पंपाच्या भाराची गणना करणाऱ्या गतिदायी (जंगम) शक्तीकरिता (मोटीव्ह पॉवर) आणि पंप हाऊस मध्ये निम्न / मध्यम व्होल्टेजच्या वापरासाठी गतिदायी (जंगम) शक्तीचे (मोटीव्ह पॉवर) सर्किट जोडण्याकरिता ४० **वॅट** पर्यंतच्या एका दिव्यास हा वीजदर प्रवर्ग लागू आहे.

हा दर फूलशेती, फलोऊत्पादन रोपवाटीका आणि वृक्षारोपण यासाठी देखील लागू आहे.

हा वीजदर प्रवर्ग ऊस क्रशर आणि / किंवा चारा कटर्स अशा स्वत:च्या वापराच्या कृषी प्रक्रिया कार्यासाठी वीज पुरवठयाकरिता देखील लागू आहे, मात्र वेगळ्या मोटारच्या सहाय्याने किंवा बेल्ट ड्राईव्ह बदलून चालविलेल्या पिठ गिरणी, तेल गिरणी किंवा त्या आवारात असलेल्या एक्सपेलर यांना हा वीजदर लागू नाही.

एल्.टी. V (ए) साठी वीजदर : कृषी - पंपसंच

१ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२५ चे वीजदर.

वापर टप्पा (के.डब्लू.एच.)	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)**
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यन्त**	रू. ४० प्रति एचपी प्रति महिना	२.३६	१.७४
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यन्त**	रू. ४५ प्रति एचपी प्रति महिना	२.५२	१.९७

टिप : वरील उद्देशाकरिता वीज पुरवठ्याच्या उच्च दाबाचा लाभ घेणाऱ्या वीज ग्राहकांना पण या वीजदर प्रवर्गानुसार दयेक आकारले जाईल.

<u>एल्.टी. V (बी) :एल्.टी. - कृषी -इतर</u>

पात्रता :

निम्न / मध्यम व्होल्टेजच्या वीज / ऊर्जा पुरवठा वापरासाठी हा वीजदर प्रवर्ग लागू असेल :-

ए) कृषी विषयक उत्पादने - प्रक्रिया किंवा इतर संबंधित साठी शीतगृहे, युनिट् आणि प्री-कुलिंग संयंत्र;

बी) कुक्कुटपालन विशेषत: उबविण्यासहित (हॅचरीज) थर देणे आणि ब्रॉयलर क्रिया;

सी) उच्च तंत्र कृषीसाठी (उदा: टिश्यू कल्चर, ग्रीन हॉउस, मशरुम लागवड क्रिया) पुरविण्यात आलेला वीजपुरवठा विशेषत: पीक लागवडीच्या प्रक्रियेशी थेटपणे संबंधीत असलेल्या उद्देशांसाठी वापरण्यात येतो. मात्र, कोणत्याही अभियांत्रिकी किंवा औद्योगिक प्रक्रियेसाठी लागू नाही;

डी) मत्स्यपालन, रेशीम उत्पादन, गुरे प्रजनन शेती इत्यादी;

इ) तबेला कि ज्यामध्ये विक्री काउंटर, दूध प्रक्रिया किंवा डेअरी/शीतगृहाशी संबंधीत कोणत्याही औदयोगीक/व्यवसायिक कार्याचा समावेश नाही.

एल्.टी. V (बी) साठी वीजदर :एल्.टी. - कृषी -इतर

वापर टप्पा (के.डब्लू.एच.)	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)**
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यंन्त**	रू. ९५ प्रति केडब्लू प्रति महिना	४.७९	१.७४
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यंन्त**	रू. १०० प्रति केडब्लू प्रति महिना	४.९३	१.९७

टिप : वरील उद्देशाकरिता वीज पुरवठ्याच्या उच्च व्होल्टजेचा लाभ घेणाऱ्या वीजग्राहकांना पण या वीजदर प्रवर्गानुसार देयक आकारले जाईल.

एल टी VI : एल टी - विद्युत वाहन – (ई.व्ही.) चार्जिंग स्टेशन

पात्रता :

सदर वीजदर प्रवर्ग, **विद्युत** वाहनाच्या बॅटरी अदलाबदल (स्वॅपिंग) स्टेशनसहित **विद्युत** वाहन चार्जिंग स्टेशनाकरिता वीजपुरवठा करण्यासाठी लागू आहे.

ग्राहक आपल्या आवारात स्वत:चे **विद्युत** वाहनचार्जिंग करण्यासाठी वीजपुरवठा वापरत असल्यास,अशा आवाराच्या प्रवर्गानुसार सदर वीजदर लागू असतील. ग्राहकाला या प्रवर्गांतर्गत विदयुत वाहन (ई.व्ही.) चार्जिंग स्टेशनसाठी वेगळे कनेक्शन घेण्याचा पर्याय आहे.

उपहारगृह, विश्रांतीकक्ष, सुविधा स्टोअर (कन्वेनियन्स स्टोअर) इत्यादी सारख्या चार्जिंग स्टेशनमधील इतर सुविधांसाठी वीज वापराकरिता वाणिज्यीक प्रवर्गाला लागू असलेल्या वीज दरानुसार शुल्क आकारले जाईल.

एल टी VI साठी वीज दर सूची : एल टी - विद्युत वाहन – (ई.व्ही.) चार्जिंग स्टेशन

१ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२५ चे वीजदर.

वापर टप्पा (के. डब्ल्यू.एच.)	स्थिर/मागणी आकार	ऊर्जा आकार (रू./के. डब्ल्यू.एच.)	वहन (व्हिलिंग) आकार (रू./के. डब्ल्यू.एच.)
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यन्त**	रू. ७५ प्रति केव्हिए प्रति महिना	५.५१	१.७४
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यन्त**	रू. ८० प्रति केव्हिए प्रति महिना	५.७८	१.९७
टिओडी वीजदर (वरील मूळ दरा व्यतिरिक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

उच्च दाब (एच्.टी) वीजदर

एच्.टी I : एच्.टी - औद्योगिक

पात्रता :

सदर वीजदर प्रवर्ग उत्पादन आणि प्रक्रिया, तसेच त्या औद्योगिक आवारातील सामाईक प्रकाश (दिवे), गरम / थंड करणे इत्यादी औद्योगिक वापरासाठी अती उच्च व्होल्टेजना (१३२ के.व्ही /

११० के.व्ही) आणि उच्च व्होल्टेजना (३३ के.व्ही / ११ के.व्ही) स्वरुपात वीज पुरवठ्याकरिता लागू आहे.

प्रशासकीय कार्यालये / कॅन्टीन, मनोरंजन हॉल/ स्पोर्टस् क्लब किंवा सुविधा / हेल्थ क्लब किंवा सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव जे केवळ औद्योगिक कर्मचा-यांच्या वापराकरिता असतील असे; उद्‌वाहन, पाण्याचे पंप, अग्निशमन पंप आणि उपकरणे, रस्ते व सामाईक आवारातील दिवे; संशोधन व विकास युनिट इत्यादी –

मात्र, अशा सर्व सुविधा त्याच औद्योगिक आवारात असतील आणि एकाच जागेवरून (पॉईंटमधून) वीज पुरवठा होत असल्यास.

महाराष्ट्र राज्य सरकारने लागू केलेल्या माहिती तंत्रज्ञान / आय.टी धोरणात परिभाषित केल्यानुसार माहिती तंत्रज्ञान (आय.टी) किंवा आय.टी तत्सम सेवा (आय.टी.इ.एस.) युनिटच्या वीज / ऊर्जा वापरण्यासाठी सदर वीजदर प्रवर्ग लागू असेल.

हि दर सूची महाराष्ट्र शासन धोरण, २०१८ अंतर्गत एकात्मिक लॉजिस्टीक पार्कसाठी सुद्‌धा लागू होईल.

पुढील उद्देशांसाठी वीज / ऊर्जा पुरवठा (परंतु एवढयाकरिता मर्यादित नाही) देखील लागू असेल.

ए) धोबी आणि कपडे धुण्याचे उपक्रम.

बी) पिठाची गिरणी, डाळ गिरणी, तांदूळ गिरणी, पोहा गिरणी, मसाला गिरणी, सॉ मिल्स, गुरे व कुकुटपालन अन्न उत्पादन कारखाने.

सी) आईस फॅक्टरीज, आईस्क्रिम उत्पादन युनिट, दुग्ध प्रक्रिया (मिल्क प्रोसेसिंग) / शीतकरण संयंत्र (दुग्ध);

डी) अभियांत्रिकी कार्यशाळा, अभियांत्रिकी वस्तू उत्पादन युनिटस्; मुद्रणालय; रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) दुरूस्ती कार्यशाळा; टायर रिट्रेडिंग युनिटस्, व्हल्कॅनाइझिंग युनिटस्; रबर उत्पादन निर्मिती आणि पॅकेजींग मटेरिअल मॅन्यूफॅक्चरींग.

इ) संरक्षण आस्थापनाचे अध्यादेश / दारूगोळा कारखाने.

एफ) खाणकाम, उत्खनन आणि दगड क्रशिंग युनिटस्;

जी) कापड उत्पादन गट (गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग युनिटस्);

एच) साबण आणि सौंदर्य प्रसाधने, दुर्गंधीनाशक उत्पादन इत्यादी

आय) एलपीजी / सीएनजी बॉटलींग संयंत्र इ.;

जे) एच्.टी प्रवर्गांतर्गत नसलेले मल:निसारण प्रक्रिया संयंत्र / औदयोगिक परिसरातील सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र आणि – सार्वजिनक सेवा (इतर).

के) निर्मिती संयंत्रकाला स्टार्ट-अप ऊर्जा, म्हणजेच, युनिट आणि त्याची सहाय्यकारी यंत्रणा कार्यान्वित करताना ऊर्जासंयंत्राच्या (पॉवर प्लांट) चाचणीसाठी आवश्यक असलेली ऊर्जा, आणि त्याच्या स्टार्ट-अपकरिता नियोजित किंवा सक्तीच्या आऊटेजनंतर (परंतु बांधकामासाठी नाही) लागणारी ऊर्जा;

एल) वीट भटटी/ बायोमास पॅलेट.

एम) महाराष्ट्र सरकारच्या जैवतंत्रज्ञान (बायोटेक्नॉलॉजी) धोरणाअंतर्गत समावेश असलेले जैवतंत्रज्ञान उदयोग (बायोटेक्नॉलॉजी इंडस्ट्रीज);

एन) एल्.टी. V (बी) – शेती (इतर) प्रवर्गांतर्गत समाविष्ट नसलेले शीतगृह (कोल्ड स्टोरेज);

ओ) अन्न प्रक्रिया युनिट (सीफूड आणि मांस यासह);

पी) एकल संशोधन व विकास युनिट.

क्यू) बियाणे उत्पादन.

आर) पॉवर प्लान्टना समर्पित पाणीपुरवठा योजना.

एस) सहाय्यक वीज पुरवठा करण्यासाठी अती उच्च दाब (इएचव्ही) / वितरण उपकेंद्र (परंतू बांधकामासाठी नाही).

टी) दूरसंचार टॉवर आणि संबंधित दूरसंचार पायाभूत सुविधा परंतू कार्यालये, दुकाने इत्यादी समाविष्ठ होत नाही.

यू) रेडी-मिक्स कँक्रिट किंवा हॉट मिक्स प्लांटस्

<u>एच्.टी I वीजदर सूची: एच्.टी - औद्योगिक</u>

वापर टप्पा	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यंन्त**	रू. ३७५ प्रति केव्हिए प्रति महिना	७.१५	०.६७
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यंन्त**	रू.४०० प्रति केव्हिए प्रति महिना	७.५१	०.७६
टिओडी वीजदर (वरील मूळ दरा व्यतिरिक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

टिप:-

- वितरण परवानाधारकासमवेत ऊर्जा संयंत्रकाद्वारे केलेल्या स्टार्ट-अप मागणी करारावरील {(के) येथे संदर्भित केल्याप्रमाणे} उपरोक्त दराच्या २५% या दराने मागणी आकार लागू असेल.
- अति उच्चदाब (इएचव्ही) स्तरावर म्हणजेच ११०/१३२ केव्हीने जोडलेल्या ग्राहकांसाठी कोणतेही वहन शुल्क लागू होणार नाही.

<u>एच्.टी II : एच्.टी - वाणिज्य</u>

<u>पात्रता:</u>

सदर वीजदर प्रवर्ग अनिवासी, बिगर औद्योगिक आणि / अथवा वाणिज्यीक परिसरात प्रकाश व्यवस्था, गरम करणे, थंड करणे, स्वयंपाक करणे, धुणे / साफ करणे, करमणूक / विश्रांती आणि पाण्याचे पंपिग इ. कारणांसाठी विविध उपकरणे चालवण्याकरिता वाणिज्यिक वापरासाठी अती उच्च व्होल्टेजना (१३२ केव्ही / ११० केव्ही) आणि उच्च व्होल्टेजना (३३ केव्ही / ११ केव्ही) वीज पुरवठ्याकरिता लागू आहे. परंतु पुढील परिसराकरिता मर्यादित नाही.

ए) शॉपिंग मॉल आणि शोरूमसह अनिवासी, वाणिज्यिक आणि व्यवसाय परिसर

बी) कोठारे/गोदामे

सी) करमणुकीशी संबंधित सुविधांसाठी एकत्रित प्रकाश आणि ऊर्जा सेवा, ज्यात फिल्म स्टुडिओ, चित्रपटगृह आणि थिएटर (मल्टिप्लेक्ससह), आतिथ्य, विश्रांती, सभा / टाऊन हॉल आणि मनोरंजन व सार्वजनिक करमणुकीची ठिकाणे; यांसह मनोरंजनाशी संबंधीत सार्वजनिक सुविधा.

डी) वाणिज्यिक आस्थापनांसह, कार्यालये;

इ) विवाह हॉल, हॉटेल्स / रेस्टॉरन्ट, आईस्क्रिम पार्लर, कॉफी शॉप्स, गेस्ट हाऊस, इंटरनेट/सायबर कॅफे, टेलिफोन बूथ आणि फॅक्स / फोटोकॉपी शॉप्स;

एफ) ऑटोमोबाईल आणि इतर सर्व प्रकारच्या दुरूस्ती, सर्व्हिसिंग आणि देखभाल केंद्रे (जर विशेषत: अन्य वीजदर प्रवर्गांतर्गत समावेश नसलेली); किरकोळ गॅस भरण्याचे स्टेशन, गॅरेजसह पेट्रोल पंप व सेवा केंद्रे; गॅरेज, टोल कलेक्शन नाका (प्लाझा).

जी) टेलरिंग दुकाने, संगणक प्रशिक्षण संस्था, टायपिंग संस्था, **खाजगी** प्रशिक्षण संस्था

छायाचित्र प्रयोगशाळा, ब्यूटी पार्लर आणि सलून;

एच) बँका आणि एटीएम केंद्रे, टेलिफोन एक्सचेंज, टीव्ही स्टेशन, मायक्रोवेव्ह स्टेशन, रेडिओ स्टेशन;

आय) वाणिज्यिक संकुलामधील सामायिक सुविधा, जसे पाणी पंपिग/ लिफ्टस्/ अग्निशमन पंप्स आणि इतर उपकरणे/ रस्ते आणि इतर सामायिक परिसरातील प्रकाश (दिवे) इ.

जे) स्पोर्टस क्लब / सुविधा, हेल्थ क्लब /सुविधा, व्यायामशाळा, जलतरण तलाव इतर कोणत्याही वीजदर प्रवर्गात समाविष्ट नसलेले;

के) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) किंवा संबंधित स्थानिक प्राधिकरणाद्वारे मान्यता प्राप्त स्मारक/ऐतिहासिक/वारसा इमारती यांच्या बाहय रोषणाई;

एल) सर्व प्रकारच्या संरचना बांधकाम / पायाभूत सुविधा जसे की इमारती, पूल, उड्डाणपूल, धरणे, उर्जा स्टेशन, रस्ते, विमानतळ, सर्व कामांसाठी पाइपलाइन टाकण्यासाठी बोगदा तयार करणे;

टीप : **एच्**टी निवासी ग्राहक जे प्रति महिना ५०० युनिट पेक्षा अधिक वीजेचा वापर करत असतील (पुरवठयाचा **विद्यमान** महिना) आणि ज्यांनी त्यांच्या राहत्या जागेत बांधकाम किंवा नूतनीकरणाची कामे केली आहे. अशा ग्राहकांना तात्पुरत्या प्रवर्गाची वीज जोडणी घेण्याची आवश्यकता नाही, परंतु त्यांना **एच्**.टी.॥ वाणिज्यिक वीजदर आकारण्यात येईल.

एम) दूध संकलन केंद्र; स्वतंत्र दूग्ध शीतगृह आणि साठवण केंद्रे.

एन) सार्वजनिक सेवा किंवा औदयोगिक प्रवर्गातर्गत समाविष्ट नसलेले; मल:निसारण प्रक्रिया संयंत्र / वाणिज्यीक संकुलाकरिता सामायिक साडंपाणी प्रक्रिया संयंत्र;

ओ) जाहिराती, जाहिरात फलक (दिवा स्तंभावर लावलेले / रस्त्याच्या बाजूला संच मांडणी केलेल्या जाहिरात फलकासहित) आणि इतर वाणिज्यिक रोषणाई जसे बाहय प्रकाश झोत, डिस्प्ले, विविध वस्तू भांडार यामधील निऑन चिन्हे, मॉल्स, मल्टिप्लेक्स, थिएटर, क्लब, उपहारगृह आणि अशा इतर आस्थापना;

पी) इतर कोणत्याही एच्.टी. प्रवर्गात समाविष्ट नसलेल्या कोणत्याही कार्यासाठी तात्पुरता पुरवठा.

मात्र, तात्पुरता पुरवठा घेणाऱ्या ग्राहकाला स्थिर / मागणी आकार १.५ पट आणि उर्जा आकार १.२५ पट प्रदान करावा लागेल.

एच्.टी ॥ वीज दर सूची : एच्.टी - वाणिज्य

वापर टप्पा		स्थिर/मागणी आकार	ऊर्जा आकार (रू./के.व्हि.ए.एच.)	वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्हि.ए.एच.)
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यन्त**		रू. ३७५ प्रति केव्हिए प्रति महिना	७.६६	०.६७
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यन्त**		रू.४०० प्रति केव्हिए प्रति महिना	८.०४	०.७६
टिओडी वीजदर (वरील मूळ दरा व्यतिरिक्त)				
०६०० – ०९०० तास			-	
०९०० - १२०० तास			०.५०	
१२०० – १८०० तास			-	
१८०० – २२०० तास			१.००	
२२०० – ०६०० तास			(०.७५)	

टीप :

- एच्.टी.II प्रवर्गातील ग्राहकास स्वतंत्रपणे ओळख असणाऱ्या संस्थांकडून डाउनस्ट्रीम वापराच्या उद्देशाने एकाच पॉईंट मधून वीज पुरवठा पाहिजे असल्यास, वितरण परवानाधारकाचा अधिकृत फ्रँचायझी म्हणून काम करावे लागेल; किंवा अशा डाउनस्ट्रीम संस्थांना स्वतंत्र वैयक्तिक जोडणी घेणे आवश्यक आहे आणि त्यांना लागू असलेल्या वीजदर प्रवर्गानुसार शुल्क आकारले जाईल.

- अति उच्चदाब (इएचव्ही) स्तरावर म्हणजेच ११०/१३२ केव्हीने जोडलेल्या ग्राहकांसाठी कोणतेही वहन शुल्क लागू होणार नाही.

<u>एच्.टी.III–गट गृहनिर्माण संस्था (निवासी)</u>

पात्रता :

खालील बार्बीमध्ये, वीज (अडचणी दूर करणे) आठवा आदेश, २००५ अनुसार निवासी प्रयोजनार्थ संस्थाना एकाच जागेवरून (पॉईंटमधून) उच्च व्होल्टेजना (३३के.व्ही. / ११के.व्ही.) वीजपुरवठयाकरिता;

अ) सहकारी गट गृहनिर्माण संस्थेच्या मालकीच्या आवारातील त्याच संस्थेच्या सदस्यांना निवासी कामासाठी वीज उपलब्ध करून देण्यासाठी; आणि

ब) एखादी व्यक्तीस, निवासी उद्देशाने त्याच आवारात राहणा-या त्यांच्या कर्मचा-यांना वीज उपलब्ध करुन देण्यासाठी.

क) सशस्त्र दल/निमलष्करी दलांच्या निवासी आस्थापनांना सेवा देणे हे ग्राहक इंधन समायोजन दर (FAC) सह ऊर्जा शुल्कावर २०% सूट मिळण्यास पात्र असतील, ही २०% सूट संरक्षणासाठी सुद्धा लागू आहे.

एच्.टी.III वीज दर सूची : एच्.टी. - गट गृहनिर्माण संस्था (निवासी)

वापर टप्पा	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यंन्त**	रू. ३७५ प्रति केव्हिए प्रति महिना	७.२३	०.६७
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यंन्त**	रू.४०० प्रति केव्हिए प्रति महिना	७.५९	०.७६
टिओडी वीजदर (वरील मूळ दरा व्यतिरिक्त)			
०६०० – ०९०० तास		-	

०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

टीप : अति उच्चदाब (इएचव्ही) स्तरावर म्हणजेच ११०/१३२ केव्हीने जोडलेल्या ग्राहकांसाठी कोणतेही वहन शुल्क लागू होणार नाही.

<u>एच्.टी. IV – रेलवे, मेट्रो आणि मोनोरेल</u>

पात्रता :

सदर वीजदर प्रवर्ग रेल्वे, मेट्रो आणि मोनोरेलसहित , स्टेशन व दुकाने, कार्यशाळा, यार्डस् इत्यादींसाठी अती उच्च व्होल्टेजने (EHV) (१३२ के.व्ही. / ११० के.व्ही.) आणि उच्च व्होल्टेजने (३३ के.व्ही. / ११ के.व्ही.) वीजपुरवठा करण्यासाठी लागू आहे.

<u>एच्.टी. IV वीज दर सूची : एच्.टी – रेलवे, मेट्रो आणि मोनोरेल</u>

वापर टप्पा	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यंन्त**	रू. ३७५ प्रति केव्हिए प्रति महिना	६.८४	०.६७
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यंन्त**	रू.४०० प्रति केव्हिए प्रति महिना	७.१८	०.७६

टीप: रेल्वे / मेट्रो / मोनो रेल ला अती उच्च स्तरावर पुरवठयासाठी कोणतेही वहन शुल्क लागू होणार नाही.

एच्.टी. V –सार्वजनिक सेवा

एच्.टी. V (ए)–एच्.टी. – शासकीय शैक्षणिक संस्था आणि रूग्णालये

पात्रता :

सदर वीजदर प्रवर्ग हा राज्य किंवा केंद्र सरकार, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती इत्यादींसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांनाच्या शाळा व महाविदयालये या सारख्या शैक्षणिक संस्थांना; तसेच रूग्णालये, दवाखाने, क्लिनिक्स, प्राथमिक आरोग्य केंद्र, निदान केंद्र आणि पॅथॉलॉजी प्रयोगशाळा या सारख्या आरोग्य सेवा सुविधा; ग्रंथालये आणि सार्वजनिक वाचन कक्षांना अति उच्च व्होल्टेजने (१३२ के.व्ही. / ११० के.व्ही.) आणि उच्च व्होल्टेजने (३३ के.व्ही. / ११के.व्ही.) वीजपुरवठा करण्यासाठी लागू आहे.

सदर वीजदर प्रवर्ग हा त्या शैक्षणिक संस्था / आरोग्य सेवा सुविधेशी संलग्न असलेल्या वसतिगृह, स्पोर्टस् क्लब आणि सुविधा / आरोग्य केंद्र आणि सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव यांना देखील लागू असेल, मात्र अशा सुविधा त्याच आवारामध्ये आणि मुख्यत्वेकरून अशा शैक्षणिक संस्था आणि रूग्णालयामधील विदयार्थी / शिक्षक / कर्मचारी / रूग्ण यांच्याकरीता असल्यास सदर वीजदर लागु असेल.

हे वीज दर सार्वजनिक स्वच्छता विषयक सुविधावरील वीज पुरवठयासाठी लागू आहे.

एच्.टी. V (ए) वीज दर सूची : एच्.टी. – शासकीय शैक्षणिक संस्था आणि रूग्णालये

वापर टप्पा	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यन्त**	रू. ३७५ प्रति केव्हिए प्रति महिना	७.०८	०.६७
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी	रू.४०० प्रति केव्हिए प्रति महिना	७.४३	०.७६

१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यंन्त**			
टिओडी वीजदर (वरील मूळ दरा व्यतिरिक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

टीप : अति उच्चदाब (इएचव्ही) स्तरावर पुरवठयासाठी कोणतेही वहन शुल्क लागू होणार नाही.

<u>एच. टी. V (बी) - सार्वजनिक सेवा - इतर</u>

पात्रता :

सदर वीजदर प्रवर्ग हा अती उच्च व्होल्टेजना (EHV) (१३२ के.व्ही. / ११० के.व्ही.) आणि उच्च व्होल्टेजना (३३ के.व्ही. / ११के.व्ही.) येथे वीजपुरवठा करण्यासाठी लागू आहे:

ए) राज्य किंवा केंद्र सरकार, नगरपालिका, जिल्हापरिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती इत्यादींसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व्यतिरिक्त शाळा आणि महाविदयालयांसारख्या शैक्षणिक संस्था; रूग्णालये, दवाखाने, क्लिनिक्स्, प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र, निदान केंद्र आणि पॅथॉलॉजी प्रयोगशाळा यांसारख्या आरोग्य सेवा सुविधा; ग्रंथालय आणि सार्वजनिक वाचन कक्ष;

बी) सदर वीजदर प्रवर्ग हा त्या शैक्षणिक संस्था / आरोग्य सेवा सुविधा असलेल्या स्पोर्टस् क्लब आणि सुविधा / आरोग्य केंद्र आणि सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव यांना देखील लागू असेल, मात्र अशा सुविधा त्याच आवारामध्ये आणि मुख्यत्वेकरून अशा शैक्षणिक संस्था आणि रूग्णालये यामधील विदयार्थी / शिक्षक / कर्मचारी / रूग्ण यांच्याकरीता असल्यास सदर वीजदर लागु असेल.

सी) शासकीय व महानगरपालिका / स्थानिक प्राधिकरणे / स्थानिक स्वराज्य संस्था जसे महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती; पोलिस स्टेशन आणि

पोलिस चौकी; टपाल कार्यालये; सशस्त्र सेना / संरक्षण आणि निम-लष्करी आस्थापना या सर्वांची कार्यालये;

डी) **सेवाभिमुख** आध्यात्मिक संस्था;

इ) भाविकांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक धर्मादाय संस्था आधिनियमांतर्गत नोंदणीकृत धार्मिक संस्थाकडून निवासाची व्यवस्था, राज्य किंवा नगरपालिका / स्थानिक प्राधिकरण परिवहन आस्थापना व त्यांच्या कार्यशाळासह.

एफ) अग्निशमन सेवा स्टेशन; जेल, तुरूंग; न्यायालये;

जी) विमानतळ;

एच) बंदरे, जेट्टी आणि किना-यावरील वीज पुरवठयासाठी तरतूद.

आय) पाण्याचे पंपिंग, पाणी शुध्दीकरण आणि सार्वजिनक पाणीपुरवठा योजनेशी संबंधित काम, मल:निसारण प्रक्रिया संयंत्र आणि कचरा प्रक्रिया गट.

जे) इतर एचटी श्रेणी अंतर्गत कचरा प्रक्रिया युनिटस् आणि वॉटर एटीएम समाविष्ठ नाहीत.

के) धरणाचे काम ज्यात प्रकाशयोजना आणि इतर कामे.

एल) सार्वजनिक रस्त्यावरील प्रकाश व्यवस्था/ सर्व सामान्य जनतेच्या वापरण्याकरीता असलेला खुला मार्ग, मात्र जर असे निवासी संकुल, वाणिज्य संकुल, औदयोगिक आवार इत्यादी मधील मार्गप्रकाशाकरीता संबंधित लागू असलेले वीज प्रवर्गाच्या सूचीनूसार वीज दर आकारण्यात येतील.

<u>एच. टी. V (बी) वीज दर सूची : एच. टी. - सार्वजनिक सेवा - इतर</u>

वापर टप्पा	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१	रू. ३७५ प्रति केव्हिए प्रति महिना	७.६४	०.६७

मार्च २०२४ **पर्यन्त**			
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यन्त**	रू.४०० प्रति केव्हिए प्रति महिना	८.२५	०.७६
टिओडी वीजदर (वरील मूळ दरा व्यतिरिक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

टीप : अति उच्चदाब (इएचव्ही) स्तरावर पुरवठयासाठी कोणतेही वहन शुल्क लागू होणार नाही.

<u>एच.टी.VI</u> -<u>एच.टी.– विद्दुत वाहन (EV) चार्जिंग स्टशेन</u>

<u>पात्रता :</u>

सदर वीजदर प्रवर्ग, हा **विद्दुत** वाहनाच्या बॅटरी अदलाबदल (स्वॅपिंग) स्टेशनसहित **विद्दुत** वाहन चार्जिंग स्टेशनाकरिता वीजपुरवठा करण्यासाठी उच्च दाब (३३ केव्ही/११ केव्ही) करिता लागू आहे.

ग्राहक आपल्या आवारात स्वत:चे **विद्दुत** वाहन चार्जिंग करण्यासाठी वीजपुरवठा वापरत असल्यास, अशा आवाराच्या प्रवर्गानुसार सदर वीजदर लागू असतील. ग्राहकांना या श्रेणी अंतर्गत विदयुत वाहन (इव्ही) चार्जिंगसाठी वेगळे कनेक्शन घेण्याचा पर्याय आहे.

रेस्टॉरंटस्, विश्रांतीकक्ष, सुविधा स्टोअर (कन्व्हेनियन्स स्टोअर) इत्यादी सारख्या चार्जिंग स्टेशनमधील इतर सुविधांसाठी (जसे की रेस्टॉरंट, विश्रांतीगृह, सुविधा स्टोअर्स वैगरे) वीज वापराकरिता वाणिज्यक प्रवर्गाला लागू असलेल्या वीज दरानुसार शुल्क आकारले जाईल.

एच.टी.VI वीज दर सूची : एच.टी. – विद्युत वाहन (EV) चार्जिंग स्टेशन

वापर टप्पा	**स्थिर/मागणी आकार**	**ऊर्जा आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**	**वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्हि.ए.एच.)**
सर्व एकके - वि. व. २०२३-२४ साठी १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ **पर्यन्त**	रू. ७५ प्रति केव्हिए प्रति महिना	६.८३	०.६७
सर्व एकके - वि. व. २०२४-२५ साठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च २०२५ **पर्यन्त**	रू.८० प्रति केव्हिए प्रति महिना	७.२४	०.७६
टिओडी वीजदर (वरील मूळ दरा व्यतिरिक्त)			
०६०० – ०९०० तास		-	
०९०० - १२०० तास		०.५०	
१२०० – १८०० तास		-	
१८०० – २२०० तास		१.००	
२२०० – ०६०० तास		(०.७५)	

टीप : अति उच्चदाब (इएचव्ही) स्तरावर म्हणजेच ११०/१३२ केव्हीने जोडलेल्या ग्राहकांसाठी कोणतेही वहन शुल्क लागू होणार नाही.

संकीर्ण आणि सर्वसाधारण आकार :-

झेड-फॅक्टर (घटक) आकाराचा इंधन समायोजन आकार (एफ्.ए.सी.)

झेड-फॅक्टर (घटक) आकाराचा इंधन समायोजन आकार (एफ्.ए.सी.) संबंधित बहुवर्षिय वीजदर विनियमामध्ये निर्दिष्ट केलेल्या सूत्राप्रमाणे आणि आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या त्या त्या दिशानिर्देशांनुसार निश्चित केले जाईल आणि ते सर्व ग्राहक प्रवर्गाला त्यांनी वापर केलेल्या संपूर्ण विजेला लागू असतील.

इंधनाच्या किंमती आणि वीज खरेदी किंमतींमध्ये काही फरक असल्यास वितरण परवानाधारकाकडून त्यानुसार झेड-फॅक्टर (घटक) आकाराचा एफ.ए.सी. द्वारे समायोजित केले जाईल.
प्रत्येक महिन्यासाठी लागू असलेल्या झेड-एफएसीचा तपशील वितरण परवानाधारकाच्या वेबसाईट www.bestundertaking.com वर उपलब्ध असेल.

वीज शुल्क आणि वीज विक्रीवरील कर

आयोगाने मंजूर केलेल्या दरांव्यतिरिक्त आणि वेळोवेळी महाराष्ट्र शासनाच्या अटींच्या अनुषंगाने विदयुत शुल्क आणि वीज विक्रीवरील कर आकारला जाईल. दर व त्याच्या संदर्भातील शासकीय आदेश क्रमांक /ठराव ज्या अंतर्गत **विद्दुत** शुल्क आणि वीज विक्रीवरील कर लागू केला जातो ते ग्राहकांच्या उर्जा बिलामध्ये नमूद केले जातील. अशा ठराव / आदेशाची प्रत वितरण परवानाधारकाच्या www.bestundertaking.com वेबसाईटवर उपलब्ध केली जाईल.

पॉवर फॅक्टर गणना

जेथे स्थापित मीटरद्वारे सरासरी पॉवर फॅक्टर मोजमाप शक्य नसते, बिलिंग कालावधी दरम्यान सरासरी पॉवर फॅक्टरची गणना करण्याचे खालील सूत्र लागू केले जाईल.

$$\text{Average Power Factor} = \frac{\text{Total (kWh)}}{\text{Total (kVAh)}} \quad \Big\} \quad \text{सरासरी उर्जा घटक} = \frac{\text{एकूण (के.डब्लू.एच्.)}}{\text{एकूण (के.व्ही.ए.एच्.)}}$$

जिथे $kVAh = \sqrt{\Sigma (KWh)^2 + \Sigma (RkVAh\ Lag + RkVAh\ Lead)^2}$

(तसेच, अशा प्रकारे गणना केलेली सरासरी पॉवर फक्टर लिडींग किंवा लॅगिंग आधारावर खालील चाचण्यांकरिता असेल) :

If “RKVAh lead “ > “RkVAh lag” then “Average P.F. “ is to be treated as “Lead P.F.”

(जर, “आर.के.व्ही.ए.एच्. लिड ”>“आर.के.व्ही.ए.एच्. लॅग” तर सरासरी पॉवर फक्टर, “ लिड पॉवर फक्टर ” म्हणून समजण्यात यावा)

If “RKVAh lead “ =< “RkVAh lag” then “Average P.F. “ is to be treated as “Lag P.F.”
(जर, “आर.के.व्ही.ए.एच्. लिड ”=<“आर.के.व्ही.ए.एच्. लॅग” तर सरासरी पॉवर फक्टर, “लॅग पॉवर फक्टर ” म्हणून समजण्यात यावा)

<u>पॉवर फॅक्टर प्रोत्साहन</u>

एल्.टी. II साठी लागू : अनिवासी / वाणिज्य {एलटी II (बी), (एलटी II (सी)} मागणी करार /मंजूर भार २० किलोवॅटपेक्षा जास्त), (एलटी III (बी) : औदयोगिक २० किलोवॅट पेक्षा जास्त, एलटी IV : सार्वजनिक सेवा {एलटी IV (ए) आणि (एलटी IV (बी)} आणि एल्.टी. VI- **विद्युत** वाहन(इ.व्ही) २० किलोवॅटपेक्षा जास्त मागणी / मंजूर भार असलेले **विद्युत** वाहन चार्जिंग स्टेशन जेव्हा सरासरी पॉवर फॅक्टर ०.९५ (Lag or Lead) पेक्षा जास्त असेल आणि १ पर्यंत असेल तर, मासिक वीज बिलाच्या रकमेच्या खालील टक्केवारीच्या दराने कर आणि शुल्क वगळता प्रोत्साहन दिले जाईल.

अनु.क्र.	ऊर्जा घटकाची श्रेणी	ऊर्जा घटक पातळी	प्रोत्साहन
१	०.९५१ ते ०.९५४	०.९५	०.०%
२	०.९५५ ते ०.९६४	०.९६	०.५%
३	०.९६५ ते ०.९७४	०.९७	१.०%
४	०.९७५ ते ०.९८४	०.९८	१.५%
५	०.९८५ ते ०.९९४	०.९९	२.५%
६	०.९९५ ते १.०००	१.००	३.५%

टीप : सार्वत्रिक गोळाबेरीजेनंतर पॉवर फॅक्टरची गणना ३ दशांश पर्यंत केली जाईल.

पॉवर फॅक्टर दंड

एलटी II साठी लागू : अनिवासी / वाणिज्यीक [एलटी II (बी), (एलटी II (सी)] मागणी करार / मंजूर भार २० किलोवॅटपेक्षा जास्त), (एलटी III (बी) : औदयोगिक २० किलोवॅट पेक्षा जास्त, एलटी IV : सार्वजनिक सेवा [एलटी IV (ए) आणि (एलटी IV (बी)] आणि एलटी VI : २० किलोवॅटपेक्षा जास्त मागणी करार / मंजूर भार असलेले **विद्दुत** वाहन चार्जिंग स्टेशन.

जेव्हा जेव्हा सरासरी पीएफ ०.९ (Lag or Lead) पेक्षा कमी असेल तेव्हा मासिक वीज बिलाच्या रकमेच्या खालील टक्केवारीच्या दराने कर आणि शुल्क वगळता दडं आकारला जाईल.

अनु.क्र.	ऊर्जा घटकाची श्रेणी	ऊर्जा घटक पातळी	दंड
१	०.८९५ ते ०.९००	०.९०	०.०%
२	०.८८५ ते ०.८९४	०.८९	१.०%
३	०.८७५ ते ०.८८४	०.८८	१.५%
४	०.८६५ ते ०.८७४	०.८७	२.०%
५	०.८५५ ते ०.८६४	०.८६	२.५%
६	०.८४५ ते ०.८५४	०.८५	३.०%
७	०.८३५ ते ०.८४४	०.८४	३.५%
८	०.८२५ ते ०.८३४	०.८३	४.०%
९	०.८१५ ते ०.८२४	०.८२	४.५%
१०	०.८०५ ते ०.८१४	०.८१	५.०%
...	...	...	...

टीप : सार्वत्रिक गोळा बेरीजेनंतर पॉवर फॅक्टरची गणना ३ दशांश पर्यंत केली जाईल.

त्वरित भरणा सवलत

देयक तारखेपासून (देयक मिळाल्यापासून) ७ दिवसाच्या आत देयकाची रक्कम भरल्यास ग्राहकांना मासिक बिलाच्या एक टक्का (कर व शुल्क वगळता) त्वरित भरणा सवलत प्रदान केली जाईल.

विलंबित देय आकार

देयकावर नमूद केलेल्या निर्दिष्ट तारखेच्याआत वीज देयक न भरल्यास कर, उपकर, शुल्क इत्यादीसहित देयक रक्कमेवर विलंब देय शुल्क १.२५ व्याज दराने विलंब झालेल्या देयकाच्या पहिल्या महिन्याला लागू असेल.

डिजिटल देयकासाठी सूट

लघु दाब ग्राहकांनी **क्रेडिट कार्ड**, **डेबिट कार्ड**, **ऊपिआय, बीएचआयम,** इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, मोबाईल वॉलेटस् इत्यादी डिजिटल पध्दतीने भरलेल्या त्या महिन्याच्या वीजदेयकाच्या ०.२५% सूट (कर व शुल्क वगळता)मात्र अधिकतम रु.५००/- डिजिटल सूट प्रदान करण्यात येईल.

ई-बिलासाठी सूट

लिखित / ईमेल पुष्टीकरणाद्वारे ई-बिलांची निवड करणाऱ्यांना रु. १०/- प्रति देयक / प्रति ग्राहक सूट प्रदान केली जाईल.या ग्राहकांना देयकाची प्रत दिली जाणार नाही.

थकबाकीवरील व्याजदर

देयकाच्या थकबाकीवरील व्याजदर खालीलप्रमाणे असेल :

अनु. क्र.	**वीज देयक भरण्यास विलंब (महिने)**	**व्याज दर प्रति वर्ष (%)**
१	वीज देयकाच्या तारखेपासून ६० दिवसानंतर व ९० दिवसाच्या आत वीज देयक भरणा केल्यास	१२ %
२	वीज देयक ९० दिवसानंतर भरणा केल्यास	१५ %

प्रिपेड कनेक्शन असलेल्या ग्राहकांसाठी सूट:

प्रिपेड मीटर कनेक्शन असलेल्या ग्राहकांना ग्राहक श्रेणीसाठी लागू असलेल्या ऊर्जा आकारामध्ये (इंधन समायोजन आकारासहीत) २% सवलत मिळेल.

<u>लोड फक्टर प्रोत्साहन</u>

७५% पेक्षा अधिक आणि ८५% पर्यंत भार घटक असणाऱ्या ग्राहकांना ७५% ते ८५% भार घटकाच्या प्रत्येक % पॉईंट वाढीनुसार उर्जा आकाराच्या ०.७५% सुटीस पात्र असतील. ८५% पेक्षा अधिक भार घटक असणाऱ्या ग्राहकांना ८५% पेक्षा अधिक भार घटकाच्या प्रत्येक % पॉईंट वाढीनुसार उर्जा आकाराच्या १% सूटीस पात्र असतील. एकूण सूट ही ग्राहकाला लागू असलेल्या उर्जा आकाराच्या १५% मर्यादेच्या अधीन असेल.

ही सूट फक्त एच्टी I: औदयोगिक, एच्टी II : वाणिजिक आणि एच्टी V :सार्वजिनक सेवा - एच्टी V (ऐ) : आणि एच्टी V (बी) : प्रवर्गातील ग्राहकांना लागू आहे.

जर ग्राहकाची वितरण परवानाधाराकाकडे थकबाकी नसल्यास आणि वीज बिलाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत पैसे भरले असल्यास भार घटक सूट मिळेल. तथापी, ज्या ग्राहकांना वितरण परवानाधारकाने हप्त्यांमध्ये थकबाकी भरण्यास परवानगी दिली असेल आणि असे देय हप्त्यांच्या नियोजानानुसार केले जात आहे अशा ग्राहकांना ही सूट उपलब्ध असेल. वितरण परवानाधारक अशा देयकाच्या हप्त्यांबाबत वाणिज्यिक निर्णय घेईल. लोड फॅक्टरची गणना खालीलप्रमाणे केली जाईल:

$$\textbf{Load Factor} = \frac{\text{Consumption during the month in MU}}{\text{Maximum Consumption possible during the month in MU}}$$

(लोड फॅक्टर = <u>महिन्यातील वापर एम.यु. मध्ये</u>
महिन्यातील जास्तीत जास्त वापर एम.यु. मध्ये)

Maximum consumption possible = Contract Demand (kVA) x Unity Power Factor x

(Total no. of hours during the month, less actual interruptions hours recorded on meter for billing period

{शक्य तितके जास्तीत जास्त वापर= मागणी करार (केव्हीए) xयुनिटी पॉवर फॅक्टर x (महिन्यातील एकूण तासांची संख्या, वजा मीटरमध्ये गणना केलेल्या बिलींग कालावधीतील प्रत्यक्ष व्यत्ययांचे तास)}

जर एखाद्या विशिष्ट महिन्यात ग्राहक कराराच्या मागणी पेक्षा जास्त वापर केल्यास (नॉन पीक तासांसहित म्हणजे २२.०० तास ते ६.०० तास), तर त्या महिन्यात ग्राहकास भार घटक **प्रोत्साहन** देय होणार नाही.

मागणी करारापेक्षा अधिक वापरावरील दंड :

जर एखादा ग्राहक (मागणी आधारीत वीजदर सुविधा घेत असल्यास) मागणी कराररपेक्षा अधिक वापर करत असेल तर त्याला प्रत्यक्षात नोंदवलेल्या मागणीसाठी लागू असलेल्या मागणी आकार दरावर बिल आकारले जाईल आणि लागू डिमांड चार्ज १५०% दराने जास्तीची रक्कमही आकारली जाईल. (केवळ मागणी करारापेक्षा जास्त मागणीसाठी).

या परिस्थितीत, ग्राहक वीज कायदा २००३ च्या कलम १२६ अन्वये इतर कोणत्याही कारवाईसाठी जबाबदार राहणार नाहीत कारण दंडात्मक अतिरिक्त मागणी आकार ग्राहक त्याच्या कराराच्या मागणीपेक्षा अधिक देय देण्यासबंधी दंड देईल. जर एखाध्या कॅलेंडर वर्षात एखादा ग्राहक त्याच्या मागणी करार तीन वेळापेक्षा जास्त ओलांडत असेल तर त्या कारवाईची पूर्तता विद्युत पुरवठा संहिता विनियमानूसार केली जाईल.

स्व वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्प (कॅप्टिव्ह पॉवर प्लांट) असलेल्या ग्राहकांसाठी अतिरिक्त मागणी आकार :

स्व वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्प (कॅप्टिव्ह पॉवर प्लांट) असणाऱ्या ग्राहकांना रू.२०/ केव्हीए / महिना केवळ राखीव (स्टँड-बाय) मागणी घटकाच्या मर्यादेनुसार देय असेल, संपूर्ण करार मागणीवर नाही. ग्राहकाची मागणी त्याच्या मागणी करारापेक्षा अधिक असल्यास, राखीव (स्टँड-बाय) मागणी घटकावर अतिरिक्त मागणी शुल्क आकारण्यात येईल.

<u>ग्राहकाची सुरक्षा ठेव :</u>

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पुरवठा संहिता, विद्युत पुरवठा संहिता आणि वीज गुणवत्तेसह वितरण परवानाधारकाच्या कामगिरीचे मानक) विनियम, २०२१ च्या नियमन १३ अंतर्गत निर्दिष्ट केल्याप्रमाणे ग्राहकास सुरक्षा ठेव भरेल आणि अशा सुरक्षा ठेवीवर व्याजासाठी पात्र असतील.

<u>व्याख्या :</u>

अधिकतम मागणी :–

जर आयोगाच्या सर्वसाधारण अथवा विशिष्ट आदेशात नमूद केले नसेल तर, किलो वॅट किंवा किलो वॅट ॲम्पीअर्स म्हणजे एखादया कालावधी संदर्भातील अधिकतम मागणी आणि ही मागणी पुरवल्या गेलेल्या किलो वॅट किंवा किलो वॅट ॲम्पीअर्स तासांपेक्षा दुप्पट आणि त्या काळात सलग तीस मिनिटांच्या कालखंडादरम्यान असेल.

करार मागणी :

म्हणजे किलो वॅट (केडब्ल्यू) किंवा किलो व्होल्ट ॲम्पीअर्स (केव्हीए) मधील मागणी, वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर सहमत झालेल्या करारानुसार किंवा इतर लेखी संवादाद्वारे सहमती दर्शवली गेली. (केडब्ल्यूचे केव्हीएमध्ये रुपांतर करण्यासाठी ०.८० चा पॉवर फॅक्टर लागू केला जाईल.)

मंजूर भार :

मंजूर भार म्हणजे परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर सहमत असलेल्या केडब्ल्यूचा भार.

देयक मागणी : एल्.टी. वीजदर प्रवर्ग

मासिक देयक मागणी, खालीलपेक्षा जे जास्त असेल ते :

अ) महिन्यात ०६०० ते २२०० तासांपर्यंतच्या दरम्यान नोंदविलेल्या वास्तविक कमाल मागणीच्या ६५%

ब) मागणी कराराच्या ४०%

टीप :

- ०६०० तास ते २२०० तासांच्या कालावधीत नोंदणीकृत केलेली मागणी, देयक (बिलिंग) मागणी ठरविण्याकरिता विचारात घेतली जाईल.

- जर मागणी करारामध्ये बदल केला तर वरील कालावधीचा करार ज्या महिन्यात मागणी करारात बदल झाला आहे त्या नंतरच्या महिन्यापासून गणला जाईल.

देयक मागणी: एच्.टी. वीजदर प्रवर्ग :

मासिक देयक मागणी, खालीलपेक्षा जे जास्त असेल ते :

अ) महिन्यात ०६०० ते २२०० तासांपर्यंतच्या दरम्यान नोंदविलेल्या वास्तविक कमाल मागणी.
ब) मागील अकरा महिन्यांत नोंदविण्यात आलेल्या सर्वोच्च देयक मागणी च्या ७५%, मात्र मागणी करारांच्या मर्यादेच्या अधीन असेल.

क) मागणी कराराच्या ७०% *.

* आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी ७०%, आर्थिक वर्ष २०२४-२५ : ७५%,

टीप :

- ०६०० तास ते २२०० तासांच्या कालावधीत नोंदणीकृत केलेली मागणी, देयक (बिलिंग) मागणी ठरविण्याकरिता विचारात घेतली जाईल.

- जर मागणी करारामध्ये बदल केला तर वरील कालावधीचा करार ज्या महिन्यात मागणी करारात बदल झाला आहे त्या नंतरच्या महिन्यापासून गणला जाईल.